# [ 8 ]

## ः प्रदक्षिणा ः

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरूरायांची ।
झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥ 1 ॥

गुरू भजनाचा महिमा न कळे आगमानिगमासि ।
अनुभवि ते जाणति जे गुरूपदिंचे अभिलाषी ॥ धन्य ॥ 2 ॥

पदोपदीं झाल्या अपार पुण्याच्या राशी ।
सर्वहि तींर्थे घडली आम्हां आदिकरूनि काशी ॥ धन्य ॥ 3 ॥

मृदंगतालघोळी भक्त भावार्थे गाती ।
नामसंकीर्तनें नित्यानंदे नाचती ॥ धन्य ॥ 4 ॥

कोटी ब्रम्हहत्या हरती करितां दंडवत ।
लोटांगण घालितां मोक्ष लाभें हो पायासी ॥ धन्य ॥ 5 ॥

प्रदक्षिणा करूनी देहभाव हरविला ।
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे उभा राहिला ॥ धन्य ॥ 6 ॥